**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातला प्रचार तापला
- प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची बिहारमधे नवादा इथं प्रचारसभा/महाराष्ट्रातली पहिली प्रचारसभा उद्या चंद्रपूर जिल्ह्यात मोरवा इथं घेणार
- काँग्रेसच्या स्टार प्रचारकांच्या काल राजस्थानात सभा
- कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन, चीन भारतातल्या निवडणुकांमध्ये अडथळे आणण्याच्या प्रयत्नात असल्याचा मायक्रोसॉफ्टचा इशारा
- जागतिक आरोग्य दिनानिमित्त विविध कार्यक्रम

**आणि**

- आयपीएल क्रिकेटमधे आज मुंबई इंडीयन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर, तर गुजरात टायटन्सची लढत लखनौ सुपरजायंट्स बरोबर होणार

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात लोकसभा निवडणुकीच्या प्रचारसभा होत आहेत. प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमधे नवादा इथं प्रचारसभा घेतली. काँग्रेसनं साठ दशकं सत्ता उपभोगूनही जनतेच्या उपयोगी पडतील अशी कामं केली नाहीत, असा आरोप त्यांनी केला. मोदी आज मध्यप्रदेशात जबलपूर इथं रोड शो करणार

आहेत. प्रधानमंत्री मोदी यांची महाराष्ट्रातली पहिली प्रचारसभा उद्या चंद्रपुरात भाजपा उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्यासाठी होणार आहे. मोरवा विमानतळाजवळच्या १६ एकराच्या विस्तीर्ण परिसरात ही सभा होणार असून मोदी सुमारे १० वर्षांनी चंद्रपूरमधे सभा घेणार आहेत. या सभेच्या दृष्टीनं भाजपातर्फे जय्यत तयारी होत असून सुरक्षा व्यवस्थाही ठेवण्यात आली आहे.  भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा सध्या तमिळनाडूचा दौरा करत आहेत.

<><><><><>

काँग्रेस पक्षाकडूनही काल जयपूरमध्ये प्रचारसभा घेण्यात आली. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी, देशातल्या लोकशाहीचा बचाव करणं आणि राज्यघटना सुरक्षित ठेवणं यासाठी काँग्रेसची लढाई असल्याचं वक्तव्य या सभेत केलं. काल झालेल्या या सभेत, न्याय पत्र नावानं, काँग्रेसचा निवडणूक जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. काँग्रेसनं त्यांच्या ५५ वर्षांच्या सत्ताकाळात विकासकामं केल्याचं सांगून काँग्रेस अध्यक्ष म्हणाले की, भाजपा सरकार मात्र काँग्रेसच्या काळात उभारलेल्या रेल्वे मार्गांवर रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्याचं श्रेय घेण्यात रमलं आहे. या प्रचार सभेला काँग्रेसच्या माजी अध्यक्षा आणि ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनीही संबोधित केलं. देश काही लोकांची संपत्ती नसून तो सर्वांचा आहे. मात्र गेली दहा वर्ष, बेरोजगारी, महागाई, आर्थिक संकट आणि विषमता यांना प्रोत्साहन देणाऱ्या सरकारच्या हाती देशाची सूत्र होती, अशी टीका त्यांनी सद्य सरकारवर केली.

**<><><><><>**

उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते, माजी मंत्री बबनराव घोलप आणि माजी आमदार संजय पवार यांनी कार्यकर्त्यांसह काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये प्रवेश केला. बबनराव घोलप यांनी दोन महिन्यांपूर्वीच आपल्या पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा उद्धव ठाकरे यांच्याकडे सुपूर्द केला होता. मात्र उद्धव ठाकरे यांच्याकडून काहीही प्रतिसाद न आल्यामुळे त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

बबनराव घोलप यांनी शिवसेनेमध्ये कुठल्याही मागणी शिवाय प्रवेश केला आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितलं. त्यांनी केलेल्या विनंतीला मान देऊन यापुढे त्यांना पक्षात राष्ट्रीय स्तरावर काम करण्याची जबाबदारी देण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं, महाराष्ट्रासह सहा राज्यांसाठी सामान्य आणि पोलीस अशा दोन श्रेणींमध्ये विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्रात सेवानिवृत्त सनदी अधिकारी धर्मेंद्र एस गंगवार यांची सामान्य विशेष निरीक्षक आणि भारतीय पोलिस सेवेतले माजी अधिकारी एनके मिश्रा यांची पोलिस विशेष निरीक्षक म्हणून नियुक्ती केल्याचं, आयोगानं जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटलं आहे. हे विशेष निरीक्षक कर्मचारी, सुरक्षा दलं आणि मतदान यंत्रांवर देखरेख ठेवतील. ते स्वत: राज्य मुख्यालयात थांबतील आणि आवश्यकता भासली तर संवेदनशील आणि जिथे समन्वयाची गरज आहे अशा भागांना भेट देतील.

**<><><><><>**

लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना विविध परवानग्या मिळवण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या, सुविधा या पोर्टलवर गेल्या वीस दिवसांमध्ये ७३ अर्ज उपलब्ध झाल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. प्रचारासाठी रॅली, हंगामी कार्यालयं सुरु करणं, प्रत्यक्ष भेटींनी घरोघरी जाऊन करायचा प्रचार, व्हिडिओ व्हॅन, हेलिकॉप्टर आदी बाबींसाठीच्या परवानग्या या पोर्टलवर उपलब्ध आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या धर्तीवर देण्यात येणाऱ्या या परवानग्यांसाठी ४४ हजार ६०० अर्ज मंजूर करण्यात आल्याचंही निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. या पोर्टल मुळे उमेदवारांच्या निवडणूक व्यवस्थापनात पारदर्शकताही राहणार आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण हिंगोली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता-ए आय द्वारा निर्मित मजकुराचा उपयोग करुन, भारत, अमेरिका आणि दक्षिण कोरियामधल्या आगामी राष्ट्रीय

निवडणुकांमध्ये, चीन अडथळे आणण्याच्या प्रयत्नात आहे असा इशारा, मायक्रोसॉफ्टनं दिला आहे. तैवानच्या अध्यक्षीय निवडणुकीत निकालावर परिणाम होईल अशा प्रकारे एआयचा उपयोग करण्याची चाचणी चीननं घेतल्याचा दावा केल्या नंतर, हा इशारा देण्यात आला आहे.

जगभरात, युरोपिय महासंघातल्या देशांसह किमान ६४ देशांमध्ये या वर्षी राष्ट्रीय निवडणुका होण्याची अपेक्षा आहे. मायक्रोसॉफ्टच्या दाव्यानुसार या सर्व निवडणुकांमध्ये, कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे निर्मित खोट्या बातम्या किंवा फसवा मजकूर समाज माध्यमांवर पसरवून, मतदारांवर परिणाम करत स्वतःचे हितसंबंध जपले जातील अशा प्रकारे निकाल मिळवण्याचा प्रयत्न, चीन आपल्या सायबर समुहांद्वारे करणार आहे. चीनच्या या प्रयत्नांमध्ये, उत्तर कोरिया सुद्धा सहभागी असेल असा दावाही मायक्रोसॉफ्ट नं केला आहे.

**<><><><><>**

जागतिक स्तरावर आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी यासाठी आजचा ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. १९५० सालापासून हा दिवस साजरा केला जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं या वर्षीच्या आरोग्य दिनाचं घोषवाक्य, माझं आरोग्य माझा आधिकार, असं ठेवलं आहे. आवश्यक वैद्यकिय सेवा उपलब्ध नसलेल्या जगातल्या साडेचार अब्ज नागरिकांना योग्य त्या आरोग्य सुविधा उपलब्ध करणं हे लक्ष्य निर्धारित करण्यात आलं आहे. यावेळी बोलतांना अखिल भारतीय आर्युविज्ञान संस्था दिल्लीच्या प्राध्यापक डॉ. रीमा दादा यांनी

यावेळी सांगितलं की, जीवनशैलीत बदल करुन आणि योगाभ्यास करुन अनेक रोगांपासून दूर राहाता येऊ शकतं. जीवनशैली संबंधित आजार हल्ली तरुणवर्गात मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळत असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत आज दोन सामने होणार असून पहिला सामना मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन संघांमध्ये मुंबईच्या वानखेडे स्टेडियम इथे दुपारी साडेतीन वाजता सुरू होईल. दुसरा सामना लखनौच्या एकाना सिटी इथल्या अटलबिहारी वाजपेयी स्टेडियमवर लखनौ सुपर जायन्ट्स आणि गुजरात टायटन्स या दोन संघांमध्ये रात्री साडेसात वाजता सुरू होईल. मुंबई इंडियन्सचा हा चौथा सामना असून पहिले तिन्ही सामने हरल्यामुळे हा संघ गुणतालिकेत सर्वात शेवटी म्हणजेच दहाव्या स्थानावर आहे, तर ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली दिल्ली कॅपिटल्स संघानं पहिल्या चार सामन्यांपैकी एक जिंकला असून, हा संघ नवव्या स्थानावर आहे. दुखापतीमुळे पहिले तीन सामने खेळू न शकलेला सूर्यकुमार यादव या सामन्यात खेळण्यासाठी सज्ज असून त्याचा संघात समावेश झाला तर तो नमन धीर ची जागा घेईल.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय पुरुष हॉकी संघाचा दुसरा सामना आज दुपारी पर्थ इथं होत आहे. भारतीय वेळेनुसार दुपारी २ वाजून १० मिनिटांनी हा सामना सुरु होईल. पहिल्या सामन्यात यजमान

ऑस्ट्रेलिया संघानं भारतीय संघाचा ५ विरुद्ध १ गोलनं पराभव केला होता. पाच सामन्यांच्या या मालिकेतला तीसरा सामना पर्थ इथंच बुधवारी होणार आहे.

<><><><><>

इंग्लंडमधे कॅथलीन वादळामुळे जनजीवन प्रभावित झालं असून विमानवाहतुकीवर परिणाम झाला आहे. कालपासून १३० पेक्षा जास्त उड्डाणं रद्द करण्यात आली. काल तापमान अचानक वाढलं आणि हंगामातला सर्वात उष्ण दिवस नोंदला गेला. बर्मिंगहम, एडिन्बरो, बेलफास्ट आणि मँचेस्टर विमानतळांवर प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. वादळाचा प्रभाव उद्यापर्यंत कायम राहील असा अंदाज युकेच्या हवामानशास्त्रविभागानं वर्तवला असून येत्या दोन दिवसात इंग्लंड, स्कॉटलंड आणि वेल्स मधे मिळून पुराचे १३३ इशारे जारी केले आहेत.

//<><><><><>//